महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४
दूरध्वनी क्र.०२२-२२८५०४७१
Email ID directoriayruralhousing@gmail.com
Web https://mahaawaas.com

**जा.क्र./प्रआयोग्रा-२/तारांकित प्रश्न/ ९८८ / २०२३** **दिनांक :-०६.०७.२०२३**

**प्रति,**

**प्रकल्प संचालक**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पुणे.**

**विषय :- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६८११४**
प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेस मुदतवाढ मिळून नवीन डीपीआर करणेबाबत.

**संदर्भ :-** अवर सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. विसप्र-२०२३/प्र.क्र.१५९/योजना-१०, दि.०५/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, ॲड.अशोक पवार (शिरुर), व श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेला विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६८११४ ची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन व्हावे.

प्रस्तुत विधानसभा तारांकित प्रश्नामधील मुद्दा क्र.३ च्या अनुषंगाने, आपले कार्यालयाशी संबंधित मुद्दयांची भागनिहाय उत्तरे, पूरकटिपणी व आपला वस्तुस्थिती निदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल आवश्यक त्या कागदपत्रांसह अवर सचिव, ग्राम विकास विभाग, योजना-१०, बांधकाम भवन, फोर्ट मुंबई यांना कळविण्यात यावे.व त्याची एक प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी.

सदर बाब विधानमंडळ कामकाजाशी निगडित असल्याने कृपया सर्वोच्च प्राथम्य क्रमाने विहित कालावधीमध्ये आवश्यक अहवाल सादर करावयाची कार्यवाही पूर्ण करावी ही विनंती.

**सोबत - वरिलप्रमाणे**

**(नीलेश काळे)**
**उपसंचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :** १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे यांना माहितीस्तव.
२) अवर सचिव, ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
Email ID : sangeeta.kholgadge@nic.in
दूरध्वनी क्र : ०२२-२२०६०५६८

विधानमंडळ प्राधान्य/तात्काळ

क्र.विसप्र-२०२३/प्र.क्र. १५२/योजना-१०

दिनांक :- ०५ जुलै, २०२३.

प्रति,

संचालक,
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन ( दक्षिण कक्ष),४ था मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

विषय :- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६८११४
प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेस मुदतवाढ मिळून नवीन डीपीआर करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत, अॅड.अशोक पवार (शिरुर) व श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), मा.वि.स.स. यांनी उपस्थित केलेला विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक ६८११४ पुढील प्रमाणे आहे :-

१) प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेंतर्गत पुणे जिल्हयात माहे मे २०२३ अखेर लाभार्थ्यांचे सुमारे १ लाखांपेक्षा जास्त अर्ज दाखल केलेले आहेत हे खरे आहे काय ?

२) असल्यास, या योजनेंतर्गत पुणे जिल्हयात मंजूर घरकुल सुमारे २१ हजार असून मंजूरीची टक्केवारी २१ टक्क्यांपर्यत आहे, हे खरे आहे काय,

३) असल्यास, अल्पसंख्याक समाजातील लाभार्थ्यासाठी कोणतीही स्वतंत्र योजना नसल्याने शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थी घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे माहे मार्च,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

४) असल्यास, यामध्ये या घरकुल योजनेपासून वंचित राहू नये याकरिता उर्वरित लाभार्थ्यांना नवीन डीपीआर करणेबाबत तसेच अल्पसंख्याक प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

(कृ.मा.प.)

सदर बाब विधानमंडळ कामकाजाशी निगडीत असल्याने, आपण कृपया सर्वोच्च प्राथम्यक्रमाने <u>तात्काळ</u> आवश्यक अहवाल/पूरक टिप्पणीसह शासनास सादर करावयाची कार्यवाही पूर्ण करावी, अशी विनंती आहे.

आपली,

(सं. म. खोलगाडिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : निवडनस्ती, का.योजना-१०, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक : ०४-०७-२०२३

प्रेषक:

सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

**उप सचिव**
**ग्रामविकास विभाग**
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक - ६८११४**

महोदय,

**उपरिनिर्दिष्ट प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती** या सचिवायलास **त्वरीत दोन दिवसात कळवावी** अशी विनंती आहे.

सदरहू प्रश्न स्वीकृत करण्यासारख्या आहे की नाही हे ठरविण्यासाठी ही माहिती आवश्यक असून ती हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत या सचिवालयास कळवावी. उक्त अवधीत आपणाकडून माहिती न आल्यास, प्रश्न स्वीकृत होऊन तो शासनाकडे उत्तरासाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे

सदरहू प्रश्न स्वीकृत झाल्यास, तो दिनांक २४-०७-२०२३ रोजी उत्तरासाठी ठेवण्यात येईल.

आपला

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

---

**विषय - प्रधानमंत्री आवास (शहरी)योजनेस मुदतवाढ मिळून नवीन डीपीआर करणेबाबत.**

**ॲड. अशोक पवार (शिरुर), श्री. बळवंत वानखडे (दर्यापूर)**

**सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

1. प्रधानमंत्री आवास (शहरी) योजनेंतर्गत पुणे जिल्हयात माहे मे 2023 अखेर लाभार्थ्यांचे सुमारे 1 लाखांपेक्षा जास्त अर्ज दाखल केलेले आहेत हे खरं आहे काय?

2. असल्यास, या योजनेंतर्गत पुणे जिल्हयात मंजूर घरकुल सुमारे 21 हजार असून मंजूरीची टक्केवारी 21 टक्क्यांपर्यंत आहे हे खरे आहे काय,

3 असल्यास,अल्पसंख्याक समाजातील लाभार्थ्यांसाठी कोणतीही स्वतंत्र योजना नसल्याने शाहरी व ग्रामीण भागातील लाभार्थी घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे माहे मार्च,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

४. असल्यास, यामध्ये या घरकुल योजनेपासून वंचित राहू नये याकरिता उर्वरित लाभार्थ्यांना नवीन डीपीआर करणेबाबत तसेच अल्पसंख्याक प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुल बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

५. नसल्यास विलंबनाची कारणे काय?